26-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/26/2025 12:15 AM Page 1



## निवडक

### हरमल येथे चोपडे केरी रस्ता रुंदीकरणाबाबत ७ जूनला बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५ :** चोपडे ते केरी तसेच अन्य एमडीआर व अंतर्गत रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत तसेच सर्वेक्षण सुरु केल्याने ग्रामस्थांतून प्रचंड संताप व्यक्त होत असून,त्यासाठी खास बैठक शनिवार दि. ७ जून रोजी संध्याकाळी ४.३० वाजता हरमल सार्वजनिक गणेशोत्सव सभागृहात आयोजित केली आहे.सदर बैठक वादळी होण्याची शक्यता असल्याने सरकार, वरिष्ठ अधिकारी तसेच गुप्तचर यंत्रणांना सतर्क केल्याचे खात्रीशीर वृत्त आहे.

दरम्यान, या बैठकीत होणारे निर्णय राज्यातील नगरपालिका व पंचायत समितीसाठी टर्निंग पॉइंट ठरण्याची शक्यता असून, वागातोर हणजूना भागात नागरिकांनी दिलेला घरचा अहेर राज्यात पसरण्याची वेळ ठेपली असल्याचे मत आहे.

या भागातील प्रत्येक प्रमुख रस्ता २५ मीटर व अंतर्गत रस्ते १५ मीटर रुंद करण्यासाठी प्राथमिक कार्य सुरू केले असून त्याबाबत पंचायत सचिव,तलाठी आदींना मुदतीत अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत.याबाबतीत काही निष्क्रिय पंचायत सचिव,सर्वेक्षणासाठी पंचावर दबाव टाकीत असून सर्वेक्षणास उपस्थित न राहिल्यास अपात्र होण्याची भीती घालीत असल्याचे खात्रीशीर वृत्त आहे.

दरम्यान, हा प्रकार हरमल भागातील पंच मंडळीना अवघड झालां असल्याने, हरमल पंचायत मंडळाने सामूहिक राजीनाम्याचा इशारा दिला तर अन्य पंचायत मंडळाने ग्रामस्थांच्या पाठीशी ठामपणे राहणार असल्याचे निक्षून सांगितले.

दरम्यान, या बाबतचा पहिला संघटित आवाज हरमल पंचायत क्षेत्रातील ग्रामस्थानी उठवला.त्या अंतर्गत मांद्रे मतदारसंघातील नऊ ही पंचायतीच्या सरपंच, उपसरपंच, आजी, माजी पंच व प्रमुख कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन सविस्तर माहिती दिली व गावात उद्भवणाऱ्या संभाव्य धोक्याची व विध्वंसक हालचालीची कल्पना दिली.ह्याबाबत नागरिकांनी प्रत्येक पंचायतीस खास बैठकीचे निवेदन दिले व आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे. याबाबत मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांची कित्येक कार्यकर्त्यांची भेट घेतली व शनिवार ७ जूनच्या बैठकीचे निमंत्रण दिले.त्यावेळी आमदार जीत आरोलकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व मांद्रेतील ग्रामस्थांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचे आश्वासन दिले.यामुळे विरोधकांना बळ प्राप्त झाले असून आमदार जीत आरोलकर यांच्या भूमिकेचे कौतुक केले आहे.

---

### रस्ते खोदण्यावर बंदी : उघड्या खड्ड्यांचे काय ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना उत्तर गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी दोन महिन्यांसाठी रस्ते खोदण्यावर बंदी घालण्याचा आदेश शनिवारी जारी केला. मात्र या आदेशामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. बंदी तात्काळ लागू झाली असून ती २४ जुलैपर्यंत प्रभावी राहणार आहे.

या बंदीमुळे लेखी परवानगीशिवाय कोणालाही रस्ते खोदता येणार नाहीत. मात्र, नागरिकांचा मुख्य प्रश्न आहे की, आधीच जे रस्ते खोदले गेले आहेत, त्यांचं काय होणार? बहुतांश ठिकाणी हे रस्ते पावसाचे पाणी साचण्यासाठी आदर्श खड्डे झाले असून डासांच्या प्रजननासाठी पोषक ठरत आहेत. काही ठिकाणी खड्ड्यांमध्ये माती व ढिगारे साचून वाहनचालकांसाठी धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे.

जिल्हाधिकारी यशस्विनी बी. यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वीज किंवा इतर कोणत्याही कारणासाठी रस्ते खोदण्यासाठी संबंधित सरकारी अथवा खाजगी यंत्रणांनी जिल्हाधिकाऱ्यांची शिफारस घेणे आवश्यक आहे. अर्ज संबंधित विभागाला सादर करून त्याआधारे जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा लागेल.सर्व उपविभागीय अधिकारी, तालुका अधिकारी आणि पोलीस ठाण्यांमध्ये या आदेशाचे फलक लावून जनतेला माहिती दिली जाणार आहे.

याबाबत पणजीचे रहिवासी ॲड. रुई फरेरा म्हणाले की, हा आदेश म्हणजे घोडा पळून गेल्यावर गोठ्याला कुलूप घालण्यासारखा आहे. शहरातील ड्रेनेज व्यवस्था आणि रस्त्यांची रचना पाहता अनेक ठिकाणी नाले उघडे आहेत. लोखंडी जाळ्या काढून टाकल्यामुळे प्लास्टिक व कचरा नाल्यांत जात आहे. प्रशासनाने हे आधी लक्षात घेतले असते तर आजची स्थिती निर्माण झाली नसती. हा उपाय म्हणजे परिस्थिती लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे. संजय सरमळकर यांनी सांगितले, आपत्कालीन परिस्थितीत खोदकाम गरजेचं असलं तरी, काम झाल्यानंतर त्याची दुरुस्ती व्यवस्थित होत नाही. पावसाळ्यात ही कामं अर्धवटच राहतात, त्यामुळे वाहनचालकांना धोका निर्माण होतो. प्रशासनाने सार्वजनिकपणे ही कामं का केली जात आहेत, हे स्पष्ट करावे.

क्रिस्टस लोपेस यांनी चिंता व्यक्त करत म्हटले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने आधीच १५ मेपासून खोदकामांवर बंदी घातली आहे. हा आदेश त्या पार्श्वभूमीवर अधिक ठोस आहे. मात्र, मेगा प्रोजेक्टसाठी सरकारी विभागांना परवानगी दिली जाणार का, यावर शंका आहे. सर्व कामांसाठी अधिकृत परवानगी फलक लावणे बंधनकारक करावे आणि कामानंतर रस्ता पूर्ववत केल्याची खात्री अधिकाऱ्यांनी घ्यावी.

# भोम ग्रामसभा बायपासच्या मागणीवर ठाम

## राष्ट्रीय महामार्ग-६६ च्या चौपदरीकरणास पुन्हा एकदा तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** रविवारी बाणस्तरी मार्केट कॉम्प्लेक्स हॉलमध्ये झालेल्या भोम ग्रामसभेने गावाच्या मध्यभागातून होणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-६६ च्या चौपदरीकरणास पुन्हा एकदा तीव्र विरोध नोंदवला. ग्रामसभेने पडीक शेतजमिनीतून बायपास काढण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करून तो त्वरित राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला पाठवण्याचे ठरविले. गावकऱ्यांनी चिंता व्यक्त केली की प्रस्तावित मार्गामुळे प्राचीन मंदिरे, घरांचे अस्तित्व तसेच गावाची सांस्कृतिक ओळख धोक्यात येईल. शेतजमीन पडीक आहे. महामार्ग विस्तारासाठी तीच वापरा; आमच्या मंदिरांना हात लावू नका, असे प्रतिपादन ग्रामस्थांनी ठरावाद्वारे केले.

मुस्लिमवाडा-भोम परिसरात उड्डाणपुलाच्या खांबांसाठी सुरू असलेल्या माती टाकण्याच्या कामाला तातडीने थांबा द्यावा, अशी मागणी नागरिकांनी पंचायतीकडे केली. एकीकडे मुख्यमंत्री चर्चा करू म्हणतात, तर दुसरीकडे प्रत्यक्ष काम सुरू ठेवतात. हा दुटप्पीपणा थांबवा, अशी टीका किशोर नाईक यांनी केली.

सरपंच सुनील नाईक आणि माजी सरपंच दामोदर नाईक यांनी सांगितले की, महामार्गाबाबतचे सर्व ठराव आणि पत्रव्यवहार सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्टीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाठवले असले, तरी अद्याप कोणताही अधिकृत प्रतिसाद मिळालेला नाही.राजन नाईक यांनी इशारा दिला की , सरकार आणि अधिकाऱ्यांनी



आमच्या ठरावांना दाद दिली नाही, तर पंचायत कार्यालयच बंद करा. ग्रामसभेने पंचायत सदस्यांना उपोषणाचा पर्याय खुले ठेवण्याचा सल्ला दिला.

स्थानीय नेते संजय नाईक यांनी उपस्थितांपुढे प्रश्न उपस्थित केला की, एकदा रद्द केलेली योजना पुन्हा मंजूर कशी झाली? विद्यमान रस्ता रुंदावण्याऐवजी शेत, डोंगर किंवा इतर पर्यायांचे खर्चाचे कोणतेही तुलनात्मक अभ्यास सादर का झाले नाहीत ? त्यांनी महामार्गाचा संरेखन आराखडा ग्रामस्थांना तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली. अनंतदास नाईक यांनी सांगितले की, २२ एप्रिल रोजी भोमामधील भू-सीमांकनावेळी जमीन दाखवण्याचे मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते; मात्र गावकऱ्यांना कोणतीही योजना दाखविण्यात आलेली नाही. त्यांनी १३ मे रोजी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनाची आठवण करून देत, तातडीने बैठकीचे आवाहन केले.

पडीक शेती मार्गाने चारपदरी बायपास बांधा, मुख्य रस्त्यावर सुरू असलेले ढिगारे टाकण्याचे काम तातडीने थांबवा, सरकारने संरेखन आराखडा सादर करेपर्यंत पंचायतीने सर्व शासकीय पत्रव्यवहार व सरकारी कार्यक्रमांवर बहिष्कार टाकावा, आणि मागील भू-सीमांकन मान्य नसल्याचे जाहीर करून पुनः सर्वेक्षण करा असे चार महत्वाचे ठराव यावेळी ग्रामसभेने मंजूर केले. ग्रामस्थांनी सांगितले की, ठरावांची प्रत मुख्यमंत्री प्रमोद सावंत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्टीय महामार्ग प्राधिकरणाला पाठवली जाणार आहे. अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास गावमोहीम, उपोषण आणि शांततामय आंदोलनांची मालिका सुरू करण्याचा इशारा देण्यात आला.

# सेरावली ग्रामसभेत पंचायतीच्या विभाजनाची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**सेरावली, दि. २५ :** विकासाच्या प्राधान्यक्रमांतील असमतोल आणि प्रशासनातील विसंगतींमुळे सेरावली ग्रामसभेत रविवारी तणाव निर्माण झाला. ग्रामस्थांनी एकमुखाने ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याची जोरदार मागणी केली. पंचायत स्थानिकांपेक्षा ठेकेदारांना प्राधान्य देत असल्याचा आरोप करत, अनेकांनी सध्याच्या प्रशासन व्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली.

एक पंचायत लोकांसाठी असावी आणि दुसरी बांधकाम व्यावसायिकांसाठी, अशी संतप्त प्रतिक्रिया एका ग्रामस्थाने व्यक्त केली. ही भावना गावकऱ्यांमध्ये खोलवर रुजलेल्या असंतोषाचे निदर्शक ठरली. वॉर्डांमधील असमान विकास, पश्चिम बायपासच्या कामांचा परिणाम आणि नग नियोजन व गट विकास अधिकारी यांच्याकडून होणाऱ्या निर्णय प्रक्रियेत स्थानिकांच्या सहभागाचा अभाव यांमुळे नाराजी शिगेला पोहोचली आहे.

ग्रामस्थांनी विशेषतः सखल भागात वारंवार होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्यांकडे लक्ष वेधले. पश्चिम बायपासशी संबंधित पायाभूत सुविधांच्या कामामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनल्याचे त्यांनी नमूद केले. काही वॉर्डांमध्ये चांगले रस्ते आणि ड्रेनेज आहेत, तर काहींना दर पावसाळ्यात पुराचा सामना करावा लागतो. हा अन्यायकारक असमतोल अधिक काळ सहन केला जाणार नाही, असे एका रहिवाशाने स्पष्ट केले.

सध्याच्या एकत्रित पंचायतीची कार्यक्षमता अबाधित राहिली नसल्याचा ठपका ग्रामस्थांनी ठेवला. त्यांनी एकमुखाने पंचायतीचे विभाजन करून स्वतंत्र प्रशासनिक एककांची निर्मिती करण्याची मागणी केली, जेणेकरून संसाधनांचे न्याय्य वाटप आणि समतोल विकास साधता येईल.

विकास एकतर्फी झाला आहे. जोपर्यंत पंचायत विभागली जात नाही, तोपर्यंत काही वॉर्ड कायम दुर्लक्षित राहतील,असा इशारा दुसऱ्या सहभागीने दिला. टीसीपी आणि बीडीओ अधिकाऱ्यांवर स्थानिकांच्या सल्लामसलतीविना प्रकल्प मंजूर केल्याबद्दलही सडकून टीका झाली. यापुढे कोणताही विकास प्रस्ताव मंजूर करताना पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकसहभाग आवश्यक असल्याची ठाम मागणी ग्रामस्थांनी केली.

याच ग्रामसभेत दक्षिण पश्चिम रेल्वेच्या प्रस्तावित भूसंपादनावरूनही चिंता व्यक्त झाली. खासगी मालमत्ता, शेतीची जमीन आणि पर्यावरणीय समतोल धोक्यात येण्याचा धोका असल्याने ग्रामस्थांनी या प्रकल्पाविरोधात आवाज उठवला.

पंचायत सदस्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून भूसंपादनाच्या योजनांबाबत स्पष्टता मागावी आणि कोणतेही अधिग्रहण करण्यापूर्वी स्थानिकांशी सल्लामसलत करावी, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. एकूणच, सेरावली ग्रामसभेत स्थानिक विकास, प्रशासनातील पारदर्शकतेचा अभाव आणि पर्यावरणीय धोके याबाबत तीव्र असंतोष व्यक्त होत, पंचायतीच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदलांची गरज अधोरेखित झाली.

# राय ग्रामसभेत स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येवर चिंता

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २५ : राय ग्रामसभेत ग्रामस्थांनी गंभीर चिंता व्यक्त करीत भाड्याने घेतलेल्या घरात राहणाऱ्या स्थलांतरितांची कडक पडताळणी करण्याची जोरदार मागणी केली. सरपंच मारियो डिसोझा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ग्रामस्थांनी सार्वजनिक सुरक्षितता आणि चालू पायाभूत सुविधांच्या कामांमुळे होणाऱ्या गैरसोयींशी संबंधित अनेक मुद्दे उपस्थित केले.

सरपंचाच्या मते, गावात स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येवर अनेक रहिवाशांनी चिंता व्यक्त केली. ग्रामस्थांनी आरोप केला की दिवसेंदिवस ही गर्दी वाढत आहे आणि त्यांनी जवळून देखरेखीची तातडीची गरज आहे. भाड्याच्या जागेत राहणाऱ्यांची योग्य पडताळणी आणि कागदपत्रे सुरू करण्यासाठी त्यांनी पंचायतीला त्वरित पावले उचलण्याचे आवाहन केले.

सर्व भाडेकरू नोंदणीकृत आहेत आणि योग्य पोलिस पडताळणी केली जाते याची खात्री करणे आवश्यक आहे, असे एका ग्रामस्थाने सांगितले, देखरेखीच्या अभावाबद्दल चिंता व्यक्त करणाऱ्या अनेकांच्या भावना प्रतिध्वनीत केल्या.

स्थलांतरितांच्या समस्येव्यतिरिक्त, मानोर येथे पाण्याच्या पाईपलाईन खोदकामांमुळे निर्माण झालेल्या चिखलाकडे लक्ष वेधण्यात आले. गावकऱ्यांनी तक्रार केली की खोदलेली माती रस्त्यावर वाहून जात आहे, ज्यामुळे पादचाऱ्यांसाठी आणि वाहनचालकांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीमुळे रहिवासी आणि प्रवाशांना, विशेषतः पावसाळ्यात, मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

पंचायतीला या समस्येचे त्वरित निराकरण करण्याचे आणि संबंधित विभाग किंवा कंत्राटदाराला सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि पुढील गैरसोय टाळण्यासाठी सुधारणात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्याचे आवाहन करण्यात आले.




# डबल ट्रॅकिंगमुळे इसोरसी मध्ये पर्यावरणाची मोठी हानी

## शेतजमीन चिखलाखाली शेतकऱ्यांचे नुकसान, पाणीवहन व्यवस्था निकामी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** दक्षिण पश्चिम रेल्वेच्या डबल ट्रॅकिंग प्रकल्पामुळे इसोरसी परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्यावरणीय हानी झाली असून, शतकानुशतके जुनी जलनिकासी व्यवस्था उद्ध्वस्त झाल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. अवघ्या दोन दिवसांच्या अवकाळी पावसात ही हानी प्रकर्षाने समोर आली असून, अनेक भातशेतीचे क्षेत्र चिखलात गाडले गेले आहे.

इसोरसी हे वेळसाव -पाले - इसोरसी पंचायतीचा भाग असून, येथील शेतकरी आणि ग्रामस्थांनी रेल्वेच्या बांधकाम पद्धतीवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. स्थानिकांच्या मते, ब्रिटिश काळातील जुने पाण्याचे बोगदे रेल्वेच्या कामकाजामुळे निकामी झाले आहेत. हे बोगदे पूर्वेकडून पश्चिमेकडे पावसाचे पाणी नैसर्गिकरित्या वाहून नेत असत, ज्यामुळे वनक्षेत्रातील मातीचे आणि पाण्याचे संतुलन टिकवले जात होते.

रेल्वे विकास निगम लिमिटेडच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान, पर्यावरणपूरक जलवाहिन्या बंद केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. अवकाळी पावसामुळे या बंदिस्त बोगद्यांमध्ये जमा झालेला गाळ मोठ्या प्रमाणावर अरबी समुद्राच्या दिशेने वाहून गेला असून, स्थानिकांच्या म्हणण्यानुसार जवळपास १ हजार ट्रक इतक्या प्रमाणात गाळ दरीत पडला.

सर्वाधिक हानी सेंट ग्वाडालुप चॅपलच्या आसपास झाली असून, येथील ऐतिहासिक दुहेरी बोगदा यंत्रणा आरव्हीएनएलच्या कामामुळे गाडली गेली होती. पावसाने बोगदा उघड झाल्यानंतर आता तो गाळाने भरलेला आहे. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी आता किमान ४० सेंटीमीटर खोल गाळ आहे. ब्रुनो परेरा यांच्या भातशेतीसह त्यांच्या कुटुंबातील इतर शेतजमिनीही चिखलाखाली गेल्याने त्या शेतीयोग्य राहिलेल्या नाहीत. रेल्वेने प्रस्तावित केलेली भरपाई नाकारल्याने या कुटुंबाला त्यांच्या पिढीजात जमिनीचे रक्षण करण्यासाठी लढा द्यावा लागत आहे.



माझ्यासाठी ही परिस्थिती अतिशय हृदयद्रावक आहे. मी स्वत: ब्रुनो परेरा यांना शेवटच्या हंगामात मेहनत करताना पाहिले आहे,असे गोयचो एकवोटचे संस्थापक ऑरव्हिल रॉड्रिग्ज यांनी सांगितले. त्यांनी ब्रिटिशांनी बांधलेली जलनिकासी व्यवस्था नष्ट झाल्याचा उल्लेख करताना ही घटना दुर्दैवी आणि दुर्लक्षाची फलनिष्पत्ती असल्याचे म्हटले.

होलंट येथील रहिवासी आणि पारंपरिक मासेमारी करणारे जोआओ मेनिनो यांनी वारंवार होणाऱ्या भूस्खलनामुळे त्यांच्या पारंपरिक घराला धोका निर्माण झाल्याचे सांगितले. हे घर डबल ट्रॅकिंग प्रकल्पाच्या अगदी पाठीमागे आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रेल्वे प्रशासनाने काही ठिकाणी केलेले जलनियंत्रणाचे उपाय अयशस्वी ठरले असून, पर्यावरणीय दृष्टिकोनातून अतिसंवेदनशील क्षेत्रांत मातीची मोठ्या प्रमाणात धूप होत आहे. गटारे, नाले, व जलप्रवाह नियंत्रित करणारी घन बांध नाळी' यासारखी मूलभूत व्यवस्था नष्ट झाल्याने पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे.

ज्या भातशेतीत गाळ वाहून गेला आहे, ती किमान या हंगामात तरी लागवडीयोग्य राहणार नसल्याचे स्थानिक सूत्रांचे म्हणणे आहे. या शेतीपैकी काही जमीन परेरा कुटुंबाची असल्याची माहिती समोर आली आहे.परिसरातील पर्यावरण कार्यकर्त्यांनी व स्थानिकांनी रेल्वे प्रकल्पास पूर्णतः जबाबदार धरले असून, पर्यायी पायाभूत सुविधा न देता जुन्या प्रणाली नष्ट केल्याने पूर, मातीची धूप व शेती नष्ट होण्याच्या घटनांना सुरुवात झाली आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. सरकारी यंत्रणेकडून अशा पायाभूत प्रकल्पांमध्ये पर्यावरण हानीविना विकास शक्य असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात त्याचा विपरीत परिणाम स्थानिक शेतकरी आणि रहिवाशांवर झाला आहे, हे या संपूर्ण प्रकरणावरून स्पष्ट होत आहे .

